सदर मालक यांनी नोंदणीकरण विक्री करार दि. ३०.१२.२०१५ अंतर्गत श्री. रमेशभाई आर. गढेथरिया उर्फ पटेल व अन्य. व श्री. रमेशभाई आर. गढेथरिया उर्फ पटेल व अन्य यांच्याकडून सदर गाळा खरेदी केला आहे व गाळ्याची नोंदणीकरण करार विक्रीची दि. २०.०४.२००७ अंतर्गत त्यांचे पहिले मालक श्री. प्रविणचंद ए. मेहता व सदर श्री. प्रविणचंद ए. मेहता यांनी संयुक्तरित्या श्रीम. पुनिबेन ए. मेहता (मयत झाल्यापासून) खरेदी केली आहे व नोंदणीकरण विक्री करार दि. ०९.१२.१९८७ अंतर्गत मे. वर्धमान कन्स्ट्रक्शन कं., भागीदारी संस्था (बिल्डर्स) यांच्याकडून सदर गाळा खरेदी केला आहे.

अन्य पहिले सह–मालक श्री. पुनिबेन ए. मेहता हे दि. २५.०६.१९९८ रोजी मयत झाले त्यांच्या मागे श्री. प्रविणचंद ए. मेहता व श्रीम. प्रमिलाबेन पी. मेहता व ५ अन्य वारस आहेत. अन्य कायदेशीर वारस व अन्य पहिले सह–मालक श्रीम. पुनिबेन ए. मेहता अर्थात श्रीम. प्रमिलाबेन पी. मेहता व ५ अन्य यांनी सदर गाळ्याच्या सदर विक्री वा हस्तांतरणाकरिता कपोणत्याही स्वरूपात काही आक्षेप नाही असे त्यांचे आक्षेप सांगीतले आहेत व अन्य सह–मालक यांनी व अन्य कायदेशीर वारस श्री. प्रविणचंद ए. मेहा यांनी प्रतिज्ञापत्र दि. ०३.०४.२००७ रोजी अंमलात आणून वेळोवेळी सदर करार विक्री दि. २०.०४.२००७ रोजी केला आहे.

सर्व व्यक्ती/बँक/संस्था यांना कोणतेही दावे असल्यास तसेच सदर गाळासंबंधात कोणतेही दावे तसेच खालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत मालमत्ता वा भागासंबंधात कोणतीही विक्री, अदलाबदल, गहाण, समतुल्य वा अन्य भेट, न्यास, वारसा, कौटुंबिक व्यवस्था, देखभाल, देणगी, भागीदारी, ताबा, भाडेकरार, उप–भाडेकरार, वहिवाट, धारणाधिकार, प्रभ्झार, जप्ती, सुविधाधिकार वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे अधो–हस्ताक्षरितांना त्यांच्या कार्यालयामध्ये खालील नमूद पत्त्यावर सदर सूचनेच्या १४ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यांसह सूचित करावे.

जर वरील आवश्यक कालावधीत दावे प्राप्त न झाल्यास कोणतेही दावे नाहीत असे गृहित धरले जाईल व सदर गाळा/युनिट वा अन्य भाग सर्व इच्छा व हेतुक्करिता अधित्यागीत वा परित्यागीत मानण्यात येईल व सदर मालक व माझे अशील माझ्या अशिलांचे सर्व व्यवहार समतुल्य गहाण सदर गाळा/युनिट यांच्या संबंधात सदर मालक यांना कोणतेही दावे बंधनकारक नसतील.

मालमत्तेचे विवरण :

पेट्रोल पम्प, एस. व्ही. रोड, दहिसर (पूर्व), मुंबई – ४०० ०६८ येथील एन. ए. प्लॉटवरील सीटीएस क्र. १५८९ व १५९० धारक गाव दहिसर, तालूका बोरिवली व मुंबई उपगनरीय जिल्हा व उप–नोंदणीकरण जिल्हा व नोंदणीकरण जिल्हा मुंबई उपनगर व बृहन्मुंबई महान–गरपालिकेच्या मर्यादेतील **वर्धमान आयएनडीएल. प्रेम को–ऑप. सो. लि.** म्हणून ज्ञात इमारतीच्या ३ ऱ्या मजल्यावरील गाळा/युनिट क्र. ३४१, मोजमापित ५६५ चौ. फूट (बिल्ट–अप क्षेत्र)

सही/–
करूणाकर एस. शेट्टी
कर्नाटका बँक लि. चे वकील
बोरिवली (प) शाखा, मुंबई – १०३

ठिकाण : मुंबई
दि. ०८.०९.२०१७

कार्यालय क्र. ०६, ४ था मजला, भाग्योदय बिल्डींग, ७९, नगिनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई – ४०० ००१.

जीआय इंजिनियरिंग सॉल्युशन्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: ७३ ए, एसडीएफ–III, सिप्झ, अंधेरी (पूर्व), मुंबई–४०००९६
वेबसाईट: www.giesl.com; ई–मेल: investors@giesl.com
टेलिफोन: ९१–२२–४४८८ ४४८८; फॅक्सिमाईल: ९१–२२–२८२९ ०६०३
सीआयएन:एल४०१०९एमएच२००६पीएलसी१६३७३१

११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, दूरस्थ ई–मतदान आणि बुक क्लोजरची सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनीच्या सभासदांची ११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) ही वार्षिक अहवालासह सभासदांना पाठविलेल्या अशा एजीएमला बोलाविणाऱ्या सूचनेत नमूद केलेल्या व्यवसायाचा व्यवहार करण्यासाठी कोहिनूर कॉन्टिनेंटल, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई–४०० ०५९, महाराष्ट्र येथे **गुरुवार २८ सप्टेंबर, २०१७ रोजी दु. ३.३० वा.** रोजी घेण्यात येणार आहे.

सूचनेसह एकत्रित वित्तीय वर्ष २०१६–१७ करिता वार्षिक अहवाल हा कंपनी किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंटस्कडे, ई–मेल आयडी नोंदविलेल्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमाने पाठविण्यात आला आहे. सूचनेसह वित्तीय वर्ष २०१६–१७ करिता वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत परवानगी असलेल्या पध्दतीने त्याच्या नोंदणीकृत पत्त्यावर इतर सर्व सभासदांना पाठविण्यात आली आहे. ज्या सभासदांना सूचना आणि वार्षिक अहवाल प्राप्त झालेला नाही ते वेबसाईटवरून डाऊनलोड करू शकतात किंवा कंपनीच्या नोंदणीकृत पत्त्यावर लेखी स्वरूपात त्याच्या प्रतीसाठी विनंती करू शकतात किंवा investors@giesl.com ई–मेल पाठवावा.

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १०८ सहवाचता वेळोवेळी केलेल्या सुधारणेनुसार कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) रुल्स २०१४ च्या नियम २० आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोझर रिक्वायरमेंट्स्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ४४ अनुसार कंपनीने एजीएमच्या ठिकाणाच्या व्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान पध्दतीमार्फत (दूरस्थ ई–मतदान) एजीएमच्या सूच–नेत नमूद केलेल्या ठरावावर मतदानाचा त्यांचा हक्क वापरण्यासाठी सभासदांना सुविधा देण्यासाठी सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेडसह करार केला आहे कट ऑफ तारीख अशा २० सप्टेंबर, २०१७ रोजीस प्रत्यक्ष किंवा डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात भाग धारण केलेले कंपनीचे सभासद इलेक्ट्रॉनिकली त्यांचे मतदान करू शकतात. वरील सदर तरतुदीच्या अंतर्गत आवश्यक तपशील खाली देण्यात आला आहे.

दूरस्थ ई–मतदान सुरू होण्याची तारीख व वेळ	सोमवार २५ सप्टेंबर, २०१७ रोजी स. ९.०० वा.
दूरस्थ ई–मतदान समाप्तीची तारीख व वेळ	बुधवार २७ सप्टेंबर, २०१७ रोजी सायं. ५.०० वा.

दूरस्थ ई–मतदान सुविधेला वरील सदर तारीख आणि वेळेनंतर परवानगी देण्यात येणार नाही.

ज्या व्यक्तीची नावे कट ऑफ तारखेस डिपॉझिटरीजकडे असलेले लाभकारी मालकांचे रजिस्टर किंवा सभासद रजिस्टरमध्ये नोंदविलेली असतील तेच फक्त मतपत्रिकेमार्फत एजीएममध्ये किंवा दूरस्थ ई–मतदान/बॅलट पेपरची सुविधा घेण्यास हक्कदार राहतील. कोणीही व्यक्ती जी सूचना पाठविल्यानंतर कंपनीची सभासद बनली आहे ती लॉगईन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्याच्या प्रक्रियेसाठी कंपनीचे आरटीए, मे. बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड पत्ता – १ ला मजला, भारत टिन वर्क्स बिल्डिंग, वसंत ओॲसिससमोर, मकवाना रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई–४०० ०५९ यांना लिहू शकतात किंवा investors@bigshareonline.com येथे ई–मेल करावा.

कृपया नोंद घ्यावी की, तम्ही दूरस्थ ई–मतदानामार्फत एकदा केलेल्या मतदानात तुमच्या मतदानात सुधारणा/किंवा एजीएममध्ये मतदान करता येणार नाही तथापि एजीएममध्ये हजर आणि चर्चेमध्ये सहभागी होऊ शकतात.

पोस्टल बॅलट पेपरमार्फत मतदानाची सुविधा एजीएममध्ये उपलब्ध करण्यात येईल.

ज्या सभासदांनी दूरस्थ ई–मतदान सुविधा वापरलेली नाही ते प्रत्यक्ष बॅलट पेपरमार्फत त्यांचे मतदान करू शकतात. बॅलट प्रपत्र वार्षिक अहवालाचा उर्वरित भाग असलेल्या कंपनीच्या वेबसाईटवरूनसुध्दा डाऊनलोड करता येतील. सभासदाने ठरावावर एकदा केलेल्या मतदानात सभासदांना त्यानंतर बदल करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

एजीएमच्या सूचनेसह ई–मतदानाची प्रक्रिया विहित माध्यमाने सर्व सभासदांना पाठविण्यात आली आहे आणि ती कंपनीची वेबसाईट www.giesl.com वर आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडची वेबसाईट https://www.evotingindia.com वर उपलब्ध आहे.

ई–मतदानाशी संबंधित कोणतीही चौकशी किंवा माहितीकरिता कृपया फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (''एफएक्युज'') चा संदर्भ घ्यावा आणि ई–मतदान मॉड्युल हेल्प सेक्शन अंतर्गत www.evotingindia.com येथे उपलब्ध आहे किंवा helpdesk.evoting@cdslindia.com कडे ई–मेल पाठवावा.

कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम ९१ सहवाचता त्याअंतर्गत केलेले नियम आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोझर रिक्वायरमेंट्स्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन्स ४२ अनुसार सभासद रजिस्टर आणि भाग हस्तांतरण पुस्तके ही एजीएमच्या हेतूकरिता गुरुवार २१ सप्टेंबर, २०१७ ते गुरुवार २८ सप्टेंबर, २०१७ (दोन्ही दिवस एकत्रित) पर्यंत बंद राहतील.

मतदानाचे निकष संबंधित नियमान्वये विहित केल्यानुसार घोषित करण्यात येतील आणि कंपनीच्या वेबसाईटवरसुध्दा ठेवण्यात येतील.

जीआय इंजिनियरिंग सॉल्युशन्स लिमिटेडकरिता
सही/–
साजिद मलिक
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन:००४००३६६)

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०५ सप्टेंबर, २०१७

थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: थॉमस कुक बिल्डिंग, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई – ४०० ००१
फोन नं.: +९१ २२ ४२४२ ७००० **फॅक्स:** +९१ २२ २३०२ २८६४ **टोल-फ्री नं.:** १-८००-२०९९-१००
संकेत स्थळ: www.thomascook.in **ई-मेल:** sharedept@in.thomascook.com
सीआयएन: एल६३०४०एमएच१९७८पीएलसी०२०७१७

सूचना

कंपनी कायदा, २०१३च्या कलम २०१ आणि त्याखाली तयार करण्यात अलेल्या नियमांच्या अनुषंगाने सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ (''कायदा'') च्या कलम १९७, १९८ आणि लागू असलेल्या इतर तरतुदींच्या अंतर्गत आणि कंपन्या (व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि मोबदला) नियम, २०१४ (''नियम'') च्या आणि सेक्युरिटिज् अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियमन १७(६) (त्याच्यातील कोणत्याही वैधानिक सुधारणा किंवा लागू असलेले नवे कायदे किंवा पुन्हा केलेले कायदे किंवा बदल) यांच्या अंतर्गत कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक/पूर्ण वेळ संचालक वगळून, पण स्वतंत्र संचालकांसहित कोणत्याही किंवा सर्व संचालकांना कमिशनच्या माध्यमातून, कंपनीच्या नफ्याच्या एकूण एक टक्क्यापेक्षा अधिक मोबदला देण्यासाठी केंद्र सरकारची परवानगी मागण्याची कंपनीची इच्छा आहे, मात्र सर्व गैर कार्यकारी संचालकांना (स्वतंत्र संचालकांसहित) देय असलेले एकूण कमिशन रु.६०,००,०००/– (रुपये साठ लाख मात्र) किंवा केंद्र सरकार ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी ज्या रकमेला मान्यता/मंजुरी देईल त्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही, ज्याला संचालक मंडळाने त्यांच्या दिनांक २५ मे २०१७ रोजी झालेल्या सभेत मान्यता दिलेली आहे आणि भागधारकांनी दिनांक २ ऑगस्ट २०१७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मान्यता दिलेली आहे.

थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड करीता
अमित जे. पारेख
कंपनी सचिव आणि
अनुपालन अधिकारी

स्थान : मुंबई
दिनांक : ७, सप्टेंबर २०१७

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २ मध्ये

५ वा मजला, सिंदिया हाऊस, एल ॲन्ड टी हाऊससमोर, एन. एम.मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई–४०० ००१
टी. ओ. ए. क्र. ९३४ सन २०१६
(जुना ओ. ए. क्र. ६७९ सन २०१५)

समन्स

नि. १८

बँक ऑफ महाराष्ट्र ...अर्जदार बँक

विरुद्ध

मे. शायोना टेक्सटाईल्स प्रायव्हेट लिमिटेड आणि अन्य ...प्रतिवादी

१. **ज्याअर्थी** वरील नमूद अर्जदार यांनी त्यातील नमूद विद्यमान आणि भविष्यातील व्याज, खर्च आणि इतर अनुतोषांसह एकत्रित रकमेच्या वसुलीकरिता सदर न्यायाधिकरणात वरील नमूद अर्ज दाखल केला आहे.

२. **ज्याअर्थी** साधारण स्वरुपात समन्सची बजावणी परिणामकारक होऊ शकली नाही आणि ज्याअर्थी सदर सन्मा. न्यायाधिकरणाद्वारे दुय्यम बजावणीकरिता अर्ज संमत करण्यात आला आहे.

३. तुम्हाला सदर न्यायाधिकरणासमक्ष व्यक्तिशः वा वकिलाद्वारे लेखी विवरणपत्र/म्हणणे दाखल करण्यासाठी आणि आज्ञेप्रमाणे अनुतोष का संमत करण्यात आला नाही याची कारणे दर्शविण्यासाठी दि. **११.१०.२०१७ रोजी स. ११.०० वा.** उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.

४. सूचना घ्यावी की, कसूरवार ठरल्यास, तुमच्या अनुपस्थितीत अर्जाची सुनावणी होईल आणि निर्धारित असेल.

सूचना घ्यावी की, एमडीआरटी–III मधील प्रलंबित वरील पक्षकारांच्या दरम्यानच्या ओ. ए. क्र. ६७९ सन २०१५ मधील खटला हा दिनांक २६.०९.२०१६ रोजीचा एफ. क्र. ९/९/१२ डीआरटी (भाग) भारत सरकार अधिसूचित न्यायाधिकरणाच्या बदलानुसार सदर न्यायाधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे आणि सदर खटला हा सदर न्यायाधिकरणाच्या फाईलवर टी. ओ. ए. क्र. ९३४ सन २०१६ म्हणून नोंदविण्यात आला आहे.

त्यामुळे तुम्हाला सदर सन्मा. न्यायाधिकरणासमक्ष व्यक्तिशः किंवा यथायोग्य माहिती असलेल्या वकिलांमार्फत ११.१०.२०१७ रोजी स. ११.०० वा. उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत, कसूर केल्यास योग्य तो आदेश मंजूर करण्यात येईल.

माझ्या हस्ते आणि सदर सन्मा. न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने १ सप्टेंबर, २०१७ रोजी निर्गमित/दिले.

सही/–
प्रभारी प्रबंधक,
डीआरटी–II, मुंबई

प्रति,

१. मे. शायोना टेक्सटाईल्स प्रायव्हेट लिमिटेड
ए) बी–३०६, विरवानी इंडस्ट्रियल इस्टेट, गोरेगाव (पू), मुंबई – ४०० ०६३
बी) १५८, उद्योग भवन, सोनावाला रोड, गोरेगाव (पू), मुंबई – ४०० ०६३,
सी) कार्यालय क्र. २११, सी विंग, बेलजियम चेंबर, दिल्ली गेट, रिंग रोड, सुरत, गुजरात ३९५ ००३

२) श्री. विठ्ठल नानजी व्होरा
फ्लॅट क्र. ११ए, १ ला मजला, न्यू समाधान सीएचएस लि., रहेजा टाऊनशीप, मालाड (पू), मुंबई ४०० ०९७.

३) श्रीम. नूतन विठ्ठल व्होरा
फ्लॅट क्र. ११ए, १ ला मजला, रहेजा टाऊनशीप, मालाड (पू), मुंबई ४०० ०९७.

टॅव्हर्नियर रिसोर्सेस लिमिटेड

नोंदणी कार्यालय : १०२/१०३, पेनिन्सुला सेंटर, डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुंबई–४०००१२. फोन : ९१–२२–२२११०५३४/२४१८२३६७ फॅक्स : ९१–२२–२४११३८९१
ई–मेल : tavernier.resources@gmail.com, investors.trl.@gmal.com, info@tavernier.com, **वेबसाईट :** www.tavernier.com
सीआयएन : एल५१९०९एमएच१९९४पीएलसी १९३९०१

२३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, दूरस्थ ई–मतदानाची माहिती आणि बुक क्लोझरची सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनीच्या सभासदांची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') ही सदर एजीएमला बोलाविणाऱ्या सूचनेत नमूद केलेल्या व्यवसायाचा व्यवहार करण्यासाठी १०२/१०३, पेनिन्सुला सेंटर, डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुंबई ४०० ०१२ येथील कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात बुधवार **२७ सप्टेंबर, २०१७ रोजी स. ९.३० वा.** भाप्रवे घेण्यात येणार आहे.

वार्षिक अहवाल, प्रतिपत्री प्रपत्र आणि अटेन्डन्स स्लीपसह एकत्रित इलेक्ट्रॉनिक माध्यमाने मतदानाची तपशिलवार प्रक्रिया आणि बाबी समाविष्ट ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाकरिता एजीएमच्या सूचनेची इलेक्ट्रॉनिक प्रत ही कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे ई–मेल आयडी नोंदविलेल्या सर्व सभासदांना पाठविण्यात आली आहे. ती कंपनीची वेबसाईट : **www.tavernier.com** वर सुद्धा उपलब्ध आहे. एजीएमची सूचना आणि ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाकरिता वार्षिक अहवाल हा परवानगी असलेल्या पद्धतीने त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर इतर सर्व सभासदांना पाठविण्यात आला आहे. एजीएमची सूचना कुरियर आणि ईमेलद्वारे पाठविण्याचे काम अनुक्रमे २ सप्टेंबर, २०१७ आणि ४ सप्टेंबर २०१७ रोजी पूर्ण झाले आहे.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ आणि सुधारणेनुसार कंपनीज् (मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) रुल्स २०१४ च्या नियम २० आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ४४ च्या तरतुदीनुसार कंपनीला एजीएमच्या ठिकाणाच्या व्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून एजीएममध्ये मंजूर करावयाच्या प्रस्तावित ठरावांवर इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत मतदानाची सुविधा **('दूरस्थ ई–मतदान')** तिच्या सभासदांना पुरविल्याचा आनंद होत आहे. कंपनी ई–मतदान प्लॅटफॉर्म पुरविण्यासाठी निगम व्यवहार मंत्रालयाद्वारे **('एमसीए')** प्राधिकृत एजन्सी सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड **('सीडीएसएल')** सह जोडली गेली आहे.

सर्व सभासदांना कळविण्यात येते की :

i. एजीएमला बोलाविणाऱ्या सूचनेत नमूद केलेल्या व्यवसायाचा दूरस्थ ई–मतदानाद्वारे व्यवहार करता येईल.
ii. दूरस्थ ई–मतदानाला २४ सप्टेंबर, २०१७ रोजी स. ९.०० वा. भाप्रवे सुरुवात होईल आणि २६ सप्टेंबर, २०१७ रोजी सायं. ५.०० वा. संपेल.
iii. एजीएममध्ये किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदानासाठी पात्रता ठरविण्यासाठी कट ऑफ तारीख २० सप्टेंबर, २०१७ आहे.
iv. इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे ई–मतदानाला २६ सप्टेंबर, २०१७ रोजी सायं. ५.०० वा. भाप्रवे नंतर परवानगी देण्यात येणार नाही.
v. कोणीही व्यक्ती ज्यांनी एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे भाग संपादित केले आहेत आणि कंपनीचे सभासद बनले आहेत आणि कट ऑफ तारीख म्हणजेच २० सप्टेंबर, २०१७ रोजीस भाग धारण केलेले आहेत ते tavernier.resources@gmail.com येथे विनंती पाठवून दूरस्थ ई–मतदानाकरिता युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकतात. तथापि त्या व्यक्तीने ई–मतदानाकरिता सीडीएसएलकडे अगोदर नोंदणी केली असल्यास ते मतदान करण्यासाठी विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतात.
vi. सभासदांनी नोंद घ्यावी की : ए) दूरस्थ ई–मतदान मॉड्युल २६ सप्टेंबर, २०१७ रोजी सायं. ५.०० वा. भाप्रवे नंतर सीडीएसएलद्वारे बंद करण्यात येईल आणि सभासदाने ठरावावर एकदा केलेल्या मतदानात सभासदाला त्यानंतर बदल करण्याची परवानगी देण्यात येणार नाही. बी) बॅलट पेपरमार्फत मतदानाची सुविधा एजीएममध्ये उपलब्ध करण्यात येईल. सी) ज्या सभासदाने एजीएमपूर्वी दूरस्थ ई–मतदानाद्वारे त्यांचे मतदान केलेले आहे ते सुद्धा एजीएमला हजर राहू शकतात परंतु पुन्हा त्यांचे मतदान करण्यासाठी हक्कदार नाहीत आणि डी) ज्या व्यक्तीची नावे कट ऑफ तारखेस डिपॉझिटरीजकडे असलेले लाभकारी मालकांचे रजिस्टर किंवा सभासद रजिस्टरमध्ये नोंदविलेली असतील तेच फक्त बॅलट पेपरमार्फत एजीएममध्ये मतदान तसेच दूरस्थ ई–मतदानाची सुविधा घेण्यास हक्कदार राहतील.
vii. एजीएमची सूचना कंपनीची वेबसाईट : www.tavernier.com वर आणि सीडीएसएलची वेबसाईट : www.evotingindia.com वर सुद्धा उपलब्ध आहे.
viii. कोणतीही चौकशी/तक्रारीकरिता सभासद सभासदांसाठी असलेल्या फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्युज) चा संदर्भ घेऊ शकतात आणि सभासदांकरिता ई–मतदान युजर मॅन्युअल www.evotingindia.com किंवा helpdesk.evoting@cdslindia.com येथे उपलब्ध आहे.
ix. दूरस्थ ई–मतदानाशी संबंधित कोणत्याही तक्रारी १०२/१०३, पेनिन्सुला सेंटर, डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुंबई–४०००१२ येथे स्थित कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा tav-ernier.resources@gmail.com किंवा investors.trl@gmail.com येथे ई–मेल पाठवून श्री. प्रसाद सदानंद पारकर, चीफ फायनान्शियल ऑफिसर यांना कळवू शकता.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ सहवाचता कंपनीज (मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) रुल्स २०१४ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ४२ अनुसार याद्वारे ही सुद्धा सूचना देण्यात येते की, कंपनीचे सभासद रजिस्टर आणि भाग हस्तांतर पुस्तके कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेकरिता इतर बाबीसह गुरूवार २१ सप्टेंबर, २०१७ ते बुधवार २७ सप्टेंबर, २०१७ (दोन्ही दिवस एकत्रित) पर्यंत बंद राहतील.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
टॅव्हर्नियर रिसोर्सेस लिमिटेडकरिता
सही/–
सुधीर मिलापचंद नाहेटा
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण : मुंबई.
दि. ०६ सप्टेंबर, २०१७

ब्राईट ब्रदर्स लिमिटेड

सीआयएन:एल२५२०९एमएच१९४६पीएलसी००५०५६
नोंदणीकृत कार्यालय:६१०–६११, निर्माण केंद्र, फेमस स्टुडिओ लेन, डॉ. इ. मोझेस रोड, महालक्ष्मी, मुंबई–४०० ०११. **टेलि.:** ९१२२२४९०५३२४
फॅक्स : ९१२२२४९०५३२५ **ई–मेल:**invcom@brightbrothers.co.in
वेबसाईट : www.brightbrothers.co.in

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन २ सहवाचता रेग्युलेशन ४७ अनुसार सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा ही ३० जून, २०१७ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता कंपनीचे आलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात घेण्यासाठी आणि मंजूर करण्यासाठी **गुरूवार, १४ सप्टेंबर, २०१७** रोजी आयोजित करण्यात आली आहे.

सदर सूचना ही कंपनीची वेबसाईट **www.brightbrothers.co.in** आणि स्टॉक एक्स्चेंजची वेबसाईट **www.bseindia.com** यावर उपलब्ध आहे.

ब्राईट ब्रदर्स लि. करिता
सरिता मगर
कंपनी सचिव आणि
काम्प्लायन्स ऑफिसर

ठिकाण : मुंबई
दिनांक : ८ सप्टेंबर, २०१७

Union Bank of India

'सहजीवन'–19 श्रद्धानंद रोड – विले पार्ले (पू), मुंबई 400 057
टेलि. : (डी) 26103774, (ओ) 2610 8545–2614 8664; फॅक्स : 26131771
इमेल : cbsvileparlee@unionbankofindia.com

संदर्भ : यूबीआय/व्हीपीइ/2017/314 तारीख : 17.07.2017

श्री. इदयनाथ संपत ताटे,
एफ–4/2, न्यू एअरपोर्ट कॉलनी, बामणवाडाजवळ, विले पार्ले पूर्व,
मुंबई महाराष्ट्र 400 099
आणि येथेही,
श्री. रमेश ताटे,
ए. ए. आय. कॉलनी, 36–2, सहार रोड, अंधेरी पूर्व, मुंबई,
महाराष्ट्र 400 099
आणि येथेही,
श्री. वसंत ताटे
सी//33–4, सहार पी अँड टी कॉलनी, सहार रोड, अंधेरी पूर्व,
मुंबई , महाराष्ट्र 400 099

महाशय,

विषय : सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्शन नोटीसची कार्यवाही – तुम्ही आमच्याकडे वापरत असलेल्या अनुत्पादित कर्जे (एनपीए) म्हणून वर्गीकरण झालेल्या –कर्ज सुविधांच्या संदर्भात

आम्ही आपणास कळवत आहोत की तुम्ही येणे रक्कमा/हप्ते/व्याजाचे पैसे परत न केल्यामुळे तुमच्या खात्यांचे वर्गीकरण अनुत्पादित कर्जे (एनपीए) म्हणून करण्यात आले आहे. 30.06.2017 रोजीच्या स्थितीनुसार, रू.28,46,586.90 अधिक लागू असणारे चार्जेस (रूपये अठ्ठावीस लाख सेहेचाळीस हजार पाचशे शहाऐंशी आणि पैसे नव्वद फक्त) अधिक 30.06.2017 पासून लागू होणारे चार्जेस तुमच्या खात्यात/खात्यांत खाली दाखवल्यानुसार येणे आहेत :

सुविधेचे नाव	मर्यादा (रू.)	येणे रक्कम (रू.)
1. युनियन होम (टर्म लोन)	28,70,000.00	28,46,586.90

एकूण रक्कम : रू. 28,46,586.90 अधिक लागू असणारे चार्जेस (रूपये अठ्ठावीस लाख सेहेचाळीस हजार पाचशे शहाऐंशी आणि पैसे नव्वद फक्त) अधिक 30.06.2017 पासून लागू होणारे चार्जेस.

आम्ही वारंवार मागणी करूनदेखील तुम्ही तुमच्या खात्यात/खात्यांत येणे असलेली रक्कम भरलेली नाही/तुम्ही तुमच्या दायित्वाची पूर्तता केलेली नाहीत.

आम्ही याद्वारे तुम्हाला सेक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् अँड एनफोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट कायदा, 2002 च्या कलम 13(2) नुसार **रू. 28,46,586.90 अधिक लागू असणारे चार्जेस (रूपये अठ्ठावीस लाख सेहेचाळीस हजार पाचशे शहाऐंशी आणि पैसे नव्वद फक्त)** अधिक 30.06.2017 पासून लागू होणारे चार्जेस व त्याबरोबर बेस रेट नुसार म्हणजेच 9.20% प्रति वर्ष यानुसार मासिक पद्धतीने व्याज/तुम्ही केलेल्या कर्जाच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार भरण्यास सांगत आहोत व ही नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत तुमच्या दायित्वांची संपूर्ण पूर्तता करण्यास सांगत आहोत, तसे न केल्यास आम्हाला तुम्ही बँकेच्या नावाने तारण ठेवलेल्या खालील मालमत्तांबद्दल सदर कायद्यात दिलेल्या अधिकारांपैकी एका किंवा सर्व अधिकारांचा उपयोग करून कारवाई करावी लागेल.

तारण ठेवलेल्या मालमत्ता :

क्र.	तारण मालमत्तेचे नाव	मालकाचे नाव/कर्जदार किंवा जामीनदार
1.	ड्यूप्लेक्स फ्लॅट नं. 301, 3ऱ्या व 4थ्या मजल्यावरील, डी विंग, क्षेत्रफळ सुमारे 1800 चौरस फूट (बिल्टअप एरिया) आणि 135 चौरस फूट ओपन टेरेस एरिया आणि 300 चौरस फूट पार्किंग एरिया त्रिमूर्ती कॉम्प्लेक्स नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत , प्लॉट नं. 57, सेक्टर नं. 11, कामोठे, सिडको नवी मुंबई	इदयनाथ संपत ताटे रमेश संपत ताटे वसंत संपत ताटे

1) कृपया नोंद घ्यावी की जर तुम्ही 60 दिवसांच्या आत येणे रक्कम भरली नाहीत आणि जर बँकेने या कायद्याखालील अधिकारांचा उपयोग करून कारवाई केली आणि तारण मालमत्तेच्या विक्रीतून येणे रक्कम पूर्णपणे वसूल झाली नाही तर आम्हाला तुमच्याकडून येणे असलेली शिल्लक रक्कम वसूल करण्यासाठी तुमच्याविरुद्ध न्यायालयात / डेट रिकव्हरी ट्रिब्यूनलसमोर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी लागेल.

2) सदर कायद्याच्या कलम 13(13) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, व्यवसायाच्या नेहमीच्या कामकाजातील भागाव्यतिरिक्त, तुम्हाला बँकेकडून संमती मिळवल्याखेरीज वर उल्लेख केलेल्या तारण मालमत्तांची विल्हेवाट लावता येणार नाही किंवा त्यांबद्दल व्यवहार करता येणार नाहीत.कृपया नोंद घ्यावी की या कलमाचा कोणत्याही प्रकारे भंग केल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

कळावे,
सही/–
(सुनीता हलदे)
अधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया

जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई – ४०० ००१.
फोन नं. (०२२)२२६६२४४० **ई–मेल :** collector.mumbaicity@maharashtra.gov.in
संकेतस्थळ : http//collector.mumbaicity.gov.in

जनसुनावणी

मुंबई शहर जिल्ह्यांचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यावर सीआरझोड अधिसुचना, २०११ अंतर्गत जनसुनावणी प्रस्ताव प्राप्त झालेला असून सदर प्रस्ताव हा पुनर्प्रस्थापित विनियमन क्षेत्र अधिनियम ६ जानेवारी २०११ मध्ये मुद्दा क्र ८ व्ही(डी) (सी) ४ नुसार पर्यावरण विषयक जनसुनावणी खालीलप्रमाणे ठेवण्यात येत आहे.

जाहीर सुनावणीची तारीख :	**१९.०९.२०१७**
जाहीर सुनावणीची वेळ :	**सकाळी ११.३० वाजता**
जाहीर सुनावणीचे ठिकाण :	**जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई – ४०० ००१.**

सर्व संबंधित व्यक्तींना विनंती करण्यात येते की, त्यांचे विचार/आक्षेप/टिप्पणी सदस्य सचिव, महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण, महाराष्ट्र यांना अग्रेषित करुन खालील पत्त्यावर पाठविण्यात यावेत.

मा. सदस्य सचिव,
महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण, यांचे कार्यालय,
पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नविन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई–४०० ०३२.

सर्व संबंधित व्यक्तींनी त्यांच्या सुचना, टिका–टिप्पणी, विचार तसेच आक्षेप जाहीर सुनावणीच्या दरम्यानसुद्धा लेखी किंवा तोंडी स्वरुपात नोंदविता येतील.

सही/–
जिल्हाधिकारी, मुंबई शहर

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
One Family One Bank

ठाणे विभागीय कार्यालय
बी–३७, महाबँक भवन,
वागळे इंडस्ट्रियल इस्टेट,
ठाणे (पश्चिम)–४०० ६०४
दूर. : (०२२) २५८२ ३०४०, २५८२ ९४३६, फॅक्स : (०२२) २५८२ ८९३१, ई–मेल : cmmarc_tha@mahabank.co.in

कब्जा सूचना

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकारांनी बँक ऑफ महाराष्ट्रचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये आणि कलम १३ चे पोटकलम (१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, २००२ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून,

– दिनांक ०९.०६.२०१७ रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार, **मे. श्री कुलस्वामिनी बिल्डिंग मटेरियल्स सप्लायर्स त्यांचे मालक – सौ. रक्षिता बाळकृष्ण घरत यांच्या माध्यमातून** आणि हमीदार, श्री. बाळकृष्ण शामराव घरत आणि श्री. अनिल अशोक घरत यांना **रु. ६७६८४५/–** (रु. सहा लाख शहात्तर हजार आठशे पंचेचाळीस मात्र) अधिक ०९.०६.२०१७ पासून १२.९५% दराने व्याज या रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते. सूचना रजिस्टर्ड ए. डी. टपालाद्वारा पाठविण्यात आली होती.

– दिनांक ०९.०६.२०१७ रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार, **श्री. महेश रमेश पाटील** आणि हमीदार, श्री. प्रविण चंद्रकांत पाटील आणि श्री. अरूण केशव म्हात्रे यांना **रु. ७८८४६०/–** (रु. सात लाख अठ्ठ्याऐंशी हजार चारशे साठ मात्र) अधिक ०९.०६.२०१७ पासून ११.०७% दराने व्याज या रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्यास सांगितले होते. सूचना रजिस्टर्ड ए. डी. टपालाद्वारे पाठविण्यात आली होती.

– दिनांक ०९.०६.२०१७ रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार, **संतोष गजानन पाटील** आणि हमीदार, सौ. स्वाती सुरेश पाटील, श्री. सुधाकर लक्ष्मण नाईक, श्री. सुरेश गजानन पाटील आणि श्री. किशोर गजानन पाटील यांना **रु. १०१९३७७/–** (रु. दहा लाख एकोणीस हजार तीनशे सत्त्याहत्तर मात्र) अधिक ०९.०६.२०१७ पासून ११.७% दराने व्याज या रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते. सूचना रजिस्टर्ड ए. डी. टपालाद्वारा पाठविण्यात आली होती.

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्यामुळे याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी ॲक्टचे कलम १३ चे पोटकलम (४) सहवाचता, सिक्युरिटी इन्टरेस्ट रूल २००२ चा रूल ८ अन्वये त्यांना प्राप्त अधिकारांचा वापर करून येथे खालील वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा ह्या **६ सप्टेंबर, २०१७** रोजी कब्जा घेतला.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे इशारा देण्यात येतो की, मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा बँक ऑफ महाराष्ट्राच्या वरील नमूद करण्यात आलेल्या रकमेच्या भाराअधीन राहील.

तारण मत्तेच्या विमोचनासाठी उपलब्ध असलेल्या वेळेसंबंधी ॲक्टचे कलम १३ चे पोटकलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

बँकेकडे गहाण असलेल्या आणि बँकेने कब्जा घेतलेल्या मिळकतीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

मे. श्री कुलस्वामिनी बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स (मालक – सौ. रक्षिता बाळकृष्ण घरत) यांच्या खात्यासाठी – शॉप क्र. १ ते १२, तळमजला, पो.– पारगाव, ता. पालघर, जिल्हा–पालघर–४०११०२.

शॉप क. १ ते १२, तळमजला, पो. – पारगाव, ता. पालघर, जिल्हा–पालघर –४०१ १०२

श्री. महेश रमेश पाटील यांचे खात्यासाठी

घर क्र. ३६७, हालोली येथे, पो. – दहिसर, ता. पालघर, जिल्हा–पालघर –४०१ १०२

श्री. संतोष गजानन पाटील यांच्या खात्यासाठी

ए. घर क्र. २८३, व्हिलेज – खामलोली, पो. दहिसर, ता. पालघर, जिल्हा–पालघर आणि

बी. घर क्र. ९७, व्हिलेज – खामलोली, पो. दहिसर, ता. पालघर, जिल्हा–पालघर

मुख्य व्यवस्थापक – एआरसी
आणि
प्राधिकृत अधिकारी
ठाणे

ठिकाण – पालघर
दिनांक : ०६.०९.२०१७

FEDERAL BANK
YOUR PERFECT BANKING PARTNER

शाखा : ॲसेट रिकव्हरी शाखा
दि फेडरल बँक लि. शाखा : मुंबई/ॲसेट रिकव्हरी, १३४ जॉली मेकर चेंबर्स–II, १३ वा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई–४०० ०२१, दूरध्वनी क्र. : ०२२–२२८५३७१२/२२०२८४२७
ई–मेल आयडी : **bbyo@federalbank.co.in**

ई–लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये बँकेकडे भारग्रस्त असणाऱ्या स्थावर मत्तांची विक्री

निम्नस्वाक्षरीकारांनी फेडरल बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सरफैसी ॲक्टच्या कलम १३(४) अन्वये खालील मिळकतींचा कब्जा घेतला आहे.

तमाम जनतेला कळविण्यात येते की, बँकेच्या थकीत रकमेच्या वसुलीकरिता खालील प्रकरणातील भारग्रस्त मिळकतींचा ई–लिलाव (सरफैसी ॲक्ट, २००२ अन्वये) **'जसे आहे जेथे आहे आणि जे काही आहे तेथे आहे तत्त्वावर'** केला जाईल.

कर्जदार/हमीदार/सहकर्जदार

१. **मे. रॉयल हायजिन केअर प्रा. लि.** (कर्जदार) नोंदणीकृत कार्यालय क्र. १०, सिने वंडर मॉल, कापूर बावडी, घोडबंदर रोड, ठाणे (पश्चिम)–४००६१० आणि क्रीसेंट बिझनेस पार्क, कार्यालय क्र. ६१२–६१४, ६ वा मजला, साईमठ कॉम्प्लेक्स, सफेद पूल, साकीनाका, मुंबई–४०००७२.
२. **श्री. मुश्ताक जे. हेमानी,** स्वर्गीय श्री. जाफरअली हेमानी यांचा मुलगा, राहणारा ५२, हेमानी हाऊस, कलिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई–४०००२९.
३. **श्री. सलिम हेमानी,** स्वर्गीय श्री. जाफरअली हेमानी यांचा मुलगा, राहणारा २९२०, होली हॉल, हॉस्टन, टेक्सास–७७०५४.
४. **श्रीमती सफिया हेमानी,** स्वर्गीय श्री. जाफरअली हेमानी यांची कन्या, राहणारी २९२०, होली हॉल, हॉस्टन, टेक्सास–७७०५४
५. **श्रीमती फरिदा जे. हेमानी,** स्वर्गीय श्री. जाफरअली हेमानी यांची कन्या, राहणारी ५२, हेमानी हाऊस, कलिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई–४०००२९.
६. **श्रीमती मुनिरा जी. कॉन्ट्रॅक्टर** स्वर्गीय श्री. जाफरअली हेमानी यांचा मुलगा, राहणारा एफ–९, गोल्डन पेब्बल्स, कलिना, मुंबई–४०००५५.
७. **श्री. राकेश जियालाल कौल,** राहणार फ्लॅट क्र. ३०७–३०९, इमारत क्र. २२, समर्थ आंगन II, इंद्र दर्शन III, समर्थ नगर, के. एल. वालावलकर रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई–४०००५३.
८. **श्रीमती ज्योती राकेश कौल,** राहणार फ्लॅट क्र. ३०७–३०९, इमारत क्र. २२, समर्थ आंगन II, इंद्र दर्शन III, समर्थ नगर, के. एल. वालावलकर रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई–४०००५३.
९. श्रीमती हमिदा जाफरअली हुसैनअली हेमानी यांचे कायदेशीर वारस, राहणार ५२, हेमानी हाऊस, कलिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई–४०००२९.
१०. **श्रीमती ताहेरा शब्बीरअली हेमानी** (शब्बीर हेमानी यांचे कायदेशीर वारस), राहणार ८ बी, चांद टेरेस, सेंट ॲन्ड्र्युज रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई–४०००५०.
११. **श्री. शेहजाद शब्बीरअली हेमानी** (शब्बीर हेमानी यांचे कायदेशीर वारस), राहणार ८ बी, चांद टेरेस, सेंट ॲन्ड्र्युज रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई–४०००५०.
१२. **श्रीमती शाहीन बाबुल** (शब्बीर हेमानी यांचे कायदेशीर वारस), राहणार ८ बी, चांद टेरेस, सेंट ॲन्ड्र्युज रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई–४०००५०.

तारण मत्तेचे तपशील	१२ ऑक्टो., २०१७ रोजीस थकबाकी रक्कम	राखीव किंमत रु. त	इसारा अनामत रक्कम रु.त आणि बोली वाढविणे रु.त	निविदा/इअर जमा करण्याची तारीख/वेळ	मिळकतीच्या निरी–क्षणाची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
जमिनीचे ते सर्व भाग किंवा विभाग आणि बांधकाम ज्यावर उभे आहे त्याचा सर्व्हे क्र. ८१६ आणि ८१७, प्लॉट क्र. १३, मेघानी एंटरप्रायजेसजवळ, गाव मौजे माहिम, चिंटुपाडा, पालघर (पश्चिम), जिल्हा पालघर मोजमापित २२४२ चौ. मीटर्स येथे वसलेले	३२,१८,३०,६२४.४० (फेडरल बँक) १६,६२,७९,३३७.७९ (बँक ऑफ इंडिया)	६०,५३,०००/–	**इसारा रक्कम** ६,०५,३००/– **बोली वाढविणे** ५०,०००/–	११ ऑक्टो., २०१७ दु. ३.०० वा. पर्यंत	०४–ऑक्टो.– २०१७ दु. २.०० ते सं. ४.०० च्या दरम्यान पूर्व परवानगीने	१२–ऑक्टो.– २०१७ दु. १२.०० वा.

फेडरल बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली बँकेचे मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार मे. ४ क्लोजर यांच्यामार्फत ई–लिलावाद्वारे मिळकतींची विक्री होईल. ई–लिलाव बोली अर्ज, घोषणापत्र, ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण अटी आणि शर्ती समाविष्ट ई–लिलाव निविदा दस्तावेज हे **संकेतस्थळ : https://www.bankauctions.in** यावर उपलब्ध असणार आहे. प्रस्तावित बोलीदारांना मे. ४ क्लोजर, हैदराबाद **हेल्पलाईन क्र. आणि ई–मेल आयडी : श्री. योगेश – ०८१४२०००७२५ आणि ई–मेल : yogesh@bankauctions.in आणि श्री. सुबाराव – ०८१४२००००६१ आणि ई–मेल आयडी subarao@bankauctions.in** यांच्याद्वारे ई–लिलावावर ऑनलाईन प्रशिक्षण उपलब्ध होऊ शकते. निविदा दस्ता–वेजांमध्ये दिलेल्या विहित नमुन्यातील बोली ''ऑनलाईन'' पोर्टल **https://www.bankauctions.in** मार्फत सादर करावी. इतर प्रकारे सादर करण्यात आलेली बोली विचारात घेण्यासाठी पात्र असणार नाही. **इअर डिमांड ड्राफ्ट, ईएफटी/एनईएफटी/आरटीजीएसमार्फत बँक खात्यात खाते क्र. १४०३००५१०३०००१, आयएफएससी कोड क्र. एफडीआरएल०००१४०३** येथे भरणा करावा. मिळकतींच्या राखीव किंमतींच्या १०% भरण्यात येणारे इअर, निविदा न स्वीकारल्यास त्याचा परतावायोग्य असेल.

मिळकतींचे पुढील तपशील, विक्रीचे मार्गदर्शन इ. करण्यात येणाऱ्या अटी आणि शर्ती खालील शाखेच्या पत्त्यावरून संपादन करता येऊ शकतात. मिळकतीसंदर्भातील कोणताही भार बँकेस ज्ञात आणि माहितीत आला नाही. बँक ही विक्री अंतर्गत मिळकतीसंदर्भातील कोणासही किंवा सरकारचा कोणत्याही प्रभार, धारणाधिकार आणि भार, मिळकत कर किंवा इतर कोणतेही थकीत इ. करिता जबाबदार असणार नाही. सोसायटीचे प्रभार आणि कोणतेही इतर भार असल्यास मिळकतीच्या खरेदीदारांद्वारे चुकते केले जातील. कोणतेही कारण न देता विक्री लांबविणे/पुढे ढकलणे किंवा उच्चतम निविदांसह सर्व किंवा कोणतीही निविदा/बोली स्वीकारणे किंवा न स्वीकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे असणार आहे. प्राधिकृत अधिकारी/बँकेचा निर्णय हा अंतिम असणार आहे. लिलावामध्ये सहभाग घेण्यापूर्वी संबंधित/मिळकतीसंदर्भातील हक्क विस्तार, मालकी, वैधानिक मंजुरी इ. बाबत त्याला/तिला स्वत:ची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

ई–लिलावाच्या इतर अटी आणि शर्ती खालील संकेतस्थळांमध्ये प्रकाशित आहेत.
(संकेतस्थळांचे पत्ते)

१) https://www.bankauctions.in २) http://www.federalbank.co.in

मुंबई
०४ सप्टेंबर, २०१७.

दि फेडरल बँक लि. करिता
(सरफैसी ॲक्ट अन्वये प्राधिकृत अधिकारी)